सत्यमेव जयते

# छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) - विभागीय कार्यालय, नाशिक

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

बॅरेक क्र. ८, विभागीय आयुक्त कार्यालय आवार, नाशिकरोड, नाशिक - ४२२१०१.

Email : divnashiksarthi@gmail.com दूरध्वनी क्र. ०२५३-२९९३६८९

जा. क्र. सारथी/कक्ष-२/कावि-२५९/मातोश्री वसतिगृह/२०२५/४३० दि. ०४/०७/२०२५

प्रति,

मा. व्यवस्थापकीय संचालक,
छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व
मानव विकास संस्था (सारथी), पुणे.

विषय : मातोश्री मुलींचे वसतिगृह, नाशिक येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता होणाऱ्या संभाव्य रिक्त जागांच्या प्रवेशाबाबतची मुदतवाढ जाहिरात संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेबाबत.

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई याचे शा.नि.क्र./वसति/५३१७/प्र.क्र.-१/मशि-२, दि. १८/१०/२०२२.
२. सारथी संस्थेच्या संकेतस्थळावर दि. २७/०६/२०२५ रोजीची प्रसिद्ध जाहिरात.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सादर करणेत येते की, मातोश्री मुलींचे वसतिगृह, नाशिक येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता होणाऱ्या संभाव्य रिक्त जागांच्या प्रवेशासाठी महाविद्यालयीन विद्यार्थीनींकडून मोठ्या प्रमाणात विचारणा होत आहे. महाविद्यालयांशी संपर्क केला असता, सद्यस्थितीत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता बऱ्याच अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया (Admission Cap Round) सुरु आहे अशी माहिती प्राप्त झाली आहे. तसेच रिक्त जागा विचारात घेता पुरेसे अर्ज प्राप्त झालेले नाही ते प्राप्त होणे गरजेचे आहे.

सद्यस्थितीत प्रवेश प्रकियेसाठी दि. २७/०६/२०२५ ते दि. ०९/०७/२०२५ या कालावधीसाठी जाहिरात सारथी संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आली आहे. उपरोक्त बाबी विचारात घेता सदर जाहिरात प्रसिध्दीस दि. २०/०७/२०२५ (रविवार) पर्यंत मुदतवाढ देणेत येत आहे.

त्या अनुषंगाने दि. २७/०६/२०२५ पर्यंत प्रसिध्द केलेली जाहिरात ही सारथी संकेतस्थळावर दि. २०/०७/२०२५ (रविवार) पर्यंत प्रसिध्द ठेवणेत यावी व या पत्रासोबत जोडलेली मुदतवाढ जाहिरात देखील दि. २०/०७/२०२५ (रविवार) पर्यंत प्रसिध्द ठेवणेत यावी. तसेच ऑनलाईन अर्ज करणेसाठी आवश्यक Link ही देखील दि. २०/०७/२०२५ (रविवार) पर्यंत कार्यरत (Active) ठेवणेत यावी ही विनंती.

**(ओमकार पवार)**, भा.प्र.से.
उपव्यवस्थापकीय संचालक,
सारथी, विभागीय कार्यालय, नाशिक.

सोबत : १. संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी - मुदतवाढ जाहिरात.

जिल्हाधिकारी, नाशिक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर व उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे संयुक्त विद्यमाने

## मातोश्री मुलींचे वसतिगृह, नाशिक - प्रवेश मुदतवाढ जाहिरात - सन २०२५-२६

शासन निर्णय क्र. वसति ५३१७/प्र.क्र.९/मशि-२, दि. १८ ऑक्टोबर, २०२२ अन्वये मातोश्री मुलींचे शासकीय वसतिगृह, सरस्वती नगर, धात्रक फाटा, पंचवटी, नाशिक येथे छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यांचेमार्फत मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा या लक्षित गटातील ७५ विद्यार्थीनींकरिता, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर यांचेमार्फत इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग गटातील ७५ विद्यार्थीनींकरिता तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचेमार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ५० विद्यार्थीनींकरिता अशा लक्षित घटकातील एकूण २०० विद्यार्थीनींकरिता वसतिगृह सुरु करणेत आले आहे.

दि. २७/०६/२०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीमधील अटी व शर्ती कायम आहेत, तथापि ऑनलाईन अर्ज करणे व भौतिक स्वरुपात अर्ज सादर करणे यात खालील नमूदप्रमाणे मुदतवाढ देणेत येत आहे.

ऑनलाईन अर्ज करणेसाठी दि. २०/०७/२०२५ (रविवार) पावेतो मुदतवाढ देणेत येत आहे. तसेच अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर त्याची प्रिंट काढून व त्यासोबत आवश्यक कागदपत्रे स्व-साक्षांकित करुन पोस्टाद्वारे/प्रत्यक्ष भौतिक स्वरुपात खालील नमूद पत्त्यावर दि. २३/०७/२०२५ (बुधवार) पावेतो सादर करावेत. **ऑनलाईन अर्ज भरला परंतु, तो भौतिक स्वरुपात सारथी, विभागीय कार्यालय, नाशिक येथे खालील नमूद पत्त्यावर सादर न केल्यास/प्राप्त न झाल्यास असे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.**


सारथी विभागीय कार्यालयाचा पत्ता

बॅरेक क्र. ८, विभागीय आयुक्त कार्यालय आवार, नाशिकरोड, नाशिक - ४२२ १०१.

फोन क्र. ०२५३-२९९३६८९.

ई-मेल - divnashiksarthi@gmail.com

संकेतस्थळ - https://sarthi-maharashtragov.in/


दि. : ०४/०७/२०२५

ठिकाण : नाशिक

(**ओमकार पवार,** भा.प्र.से.)

उपव्यवस्थापकीय संचालक, सारथी,

विभागीय कार्यालय, नाशिक.